मैदानावरील शाळा

अवि

मराठी : अश्विनी बर्वे



मैदानावरील शाळा

अवि

चित्र: बिल फ़ार्न्स



अध्याय एक


नवीन ज़मीन

१८८० मध्ये बिडसन परिवार, मेनमधले आपले खराब झालेल्या शेतातून कॉलरोडो या नव्या राज्यात गेले.

तिथे एका डोंगरावर त्यांनी एक कच्च्या विटांचे घर बांधले. जमीन नाग्रली, बियाणे लावले आणि गव्हयाचे पीक घेतले.

नोआह, जो नऊ वर्षांचा होता, सगळ्या कामात तो मदत करत असे, तो पाणी काढत असे आणि जनावरांना पाजत असे. तो आपले घर सापांपासून मुक्त राहील हे बघत असे, आणि चुलीतला विस्तव नेहमी पेटत राहिल हे बघत असे.

त्याने परत-परत घोड्यावर बसून मैदानी इलाख्याचा म्हणजे प्रेयरीला चक्कर मारले. तो एखाद्या पक्ष्यासारखा मुक्त होता. तो त्या मैदानी भागावर प्रेम करू लागला होता..



एक दिवस मिसेज़ बिडसन यांनी आपल्या मुलाला सांगितले, "नोआह, आपल्याकडे एक पाहुणी येणार आहे."

“कोण?" नोआहने विचारले.

“माझी बहीण आणि तुझी मावशी डोरा.”

“तू म्हणाली होती की ती एका शाळेत शिकवते.”

“ती तुला शालेय शिक्षण देण्यासाठी येत आहे.”


“शालेय शिक्षण!" नोआहने म्हटले, “मि तुझ्या आणि बाबां इतकी मेहनत करत नाही का?”





"नोआह," मिस्टर बिडसन म्हणाले, “तुझ्या आईला आणि मला मोठ्या मुश्किलेने लिहता-वाचता येऊ शकते. आम्हांला वाटते की तुला आमच्यापेक्षा चांगलं आले पाहिजे.”

नोआह कच्च्या विटांच्या घरातून बाहेर पडला. मैदानातून त्याने आकाशाकडे बघितले, “मैदानी भागात लिहणे-वाचणे तेवढेच उपयोगी आहे जितके तारे आहेत!” तो म्हणाला.



अध्याय 2

डोरा मावशी

दोन महिन्यानंतर नोआह आणि त्याची आई आपल्या वॅगनने जवळच्या रेल्वे स्टॉप पर्यंत गेले. ते घरापासून २५ मैल दूर होते. पण जेव्हा ट्रेन आली तेव्हा त्यातून कोणीच उतरले नाही.

नोआह हसला. “वाटते की डोरा मावशी समजदार झाली आणि म्हणून ती आली नाही.”

मग बैगेज कारमधून एक व्हीलचेयर उतरवली गेली. दोन माणसांनी एका महिलेला प्रवासी कारमधून उतरवून व्हीलचेअर मध्ये बसवले.

"डोरा!" मिसेज़ बिडसन ओरडली. “तर ती तू आहे?”

“हो, मीच आहे,” डोरा मावशी म्हणाली.

“पण हे तुला काय झालं?” बहिणीने विचारले.

“तू पश्चिमेला गेल्यानंतर लगेचच, एक छोटी गाडी जी मी चालवत असे, ती पलटली. त्यानंतर मला पायांचा उपयोग करता येईनासा झाला.मी माझ्याबाबतीत काही लिहले नाही कारण मला वाटत नव्हते की तू माझी चिंता करावी. पण आता मि ठीक आहे. तुझे पत्र एका आशिर्वादासारखे आले कारण मला एका बदलाची खूप गरज होती.

मिसेज़ बिडसन यांनी आपल्या बहिणीला जवळ घेतले.


“आणि हा माझा विद्यार्थी असेल ना,” डोरा मावशीने नोआहकडे बघत म्हंटले.


"नोआह," तिने विचारले, “तू शिकायला तयार आहे का?”

“या मैदानी भागात शालेय शिक्षणाची काहीच गरज नाही,” नोआह म्हणाला.

“याचा अर्थ आहे की तू नक्कीच तयार आहीस!” डोरा मावशीने हसत म्हटले.

मग दोन्ही बहिणींनी आपल्या कुटुंबांबद्दल गप्पा मारल्या. नोआह एक शब्दसुद्धा बोलला नाही.





अध्याय 3

पहिला आठवडा

सोमवार

डोरा मावशीने विट्याच्या कच्च्या घरात आपली शाळा सुरु केली. घरात अंधार असल्याकारणाने तिथे एक दिवा लावला..

पण तेव्हा नोआह दोन मैल दूर असणाऱ्या नाल्यावर पाणी आणायला निघून गेला आणि तिथून यायलाही त्याने उशीर केला.

जेव्हा तो आला तेव्हा डोरा मावशीने त्या अक्षराकडे इशारा केला जे तिने फळ्यावर लिहले होते.मावशी म्हणाला, “कृपया ते वाच..”

"ए," नोआह म्हणाला. मग तो उभा राहिला आणि त्याने बहाणा केला, “मावशी आज मि कोंबड्यांना खायला घालायला विसरलो.”

मंगळवार

जेव्हा नोआह आपली सकाळची कामे करून परत आला, तो आपल्या खुर्चीवर बसला. तो अस्वस्थ वाटत होता.

फळ्यावर डोरा मावशीने "बी" अक्षर लिहले होते. “हे अक्षर बी आहे,” त्या म्हणाला. “तुला हे वाचता येते का?”

तेव्हाच नोआहने समोरच्या अंगणात एक साप बघितला. “तो साप हटवणे गरजेचा आहे!” तो ओरडला. मग तो परत आला नाही.



बुधवार


डोरा मावशीने फळ्यावर वर्णमाला लिहिली. तिने एका छडीने अक्षरांकडे इशारा केला. "नोआह, तू यातून आपल्या नावाची अक्षरे शोधू शकतो का?”

“नाही."

"नोआह, तुला अजिबात शिकू वाटत नाही का?”

“या मैदानी भागात शिकण्याची काही गरज नाही,” तो म्हणाला.





गुरुवार

जेव्हा कधी डोरा मावशीने शिकवायचा प्रयत्न केला तेव्हा नोआहने प्रत्येकवेळी काही ना काही कामाचे कारण काढले. मग त्याने ते काम खूप हळू हळू केले.

शुक्रवार

डोरा मावशीने फळ्यावर काही अंक लिहले, “तुला मोजायला शिकायला आवडेल का?” तिने विचारले.

"डोरा मावशी," नोआह म्हणाला, “आत खूप गरम आणि अंधार आहे.”

"नोआह." डोरा मावशी म्हणाली, “तू तितकाच जिद्दी आहे जितका एखादा खेचर असतो.”



शनिवार

डोरा मावशी खूप अस्वस्थ होती, आज तिला काहीच शिकवू वाटत नव्हते.


रविवार

“मला भीती वाटते की माझी शिकवण्याची पद्धत इथे कामाला येणार नाही याची,” मावशीने आपल्या बहिणीला आणि भाऊजीना सांगितले.

"डोरा,“ तिच्या बहिणीने नम्रतेने म्हटले, “इथले जीवन खूप वेगळे आहे.”

“आणि मला भीती आहे," मिस्टर बिडसन म्हणाले, “ आपला नोआह एक सामान्य मैदानी मुलगा झाला आहे.”

हे ऐकून डोरा हसली,” आता मला समजले की मला काय करायला हवे!”





अध्याय ४

मैदानावरील शाळा

दुसऱ्या दिवशी जेव्हा नोआह पाणी भरून परत आला तेव्हा मावशी स्वतः कच्च्या घरातून बाहेर आली. तिच्या मांडीवर पुस्तक होते..

"नोआह," डोरा म्हणाली, “तू माझी व्हीलचेयर चारी बाजूला ढकल आणि मला फिरवून आण. मला तुमचा मैदानी भाग म्हणजे प्रेयरी बघण्याची इच्छा आहे.”

“इथली जमीन समतोल नाही,” नोआहने धोका सांगितला. व्हीलचेयर खाली–वर जमिनीवर चालणार नाही अशी त्याला शंका होती.

"ठीक आहे, तर, तू मला व्हीलचेयरला चांगलं बांधून टाक.”

जेव्हा नोआहने डोरा मावशीला प्रेयरीवर ढकलले तेव्हा खुर्ची उलटली आणि पलटी झाली. पण डोरा मावशीने तिला पकडून ठेवले.

"बाहेर तर खूप सुंदर आहे." डोरा मावशी म्हणाली. “अच्छा, त्या पिवळ्या फुलाचे नाव काय आहे?”

नोआहने आपले खांदे वर केले.

डोरा मावशीने आपल्या पुस्तकात बघितले. “ते एक ‘डॉगटूथ वायलेट’ फूल आहे,“ तिने वाचून सांगितले.

“ती या क्षेत्रातील एकमात्र लिली आहे. ती एका कंदातून उगवते. इंडियंस तो कंद उकडतात आणि तो खातात.”

नोआहला आश्चर्य वाटले, “हे खरं आहे का?” त्याने विचारले..

डोरा मावशीने पुस्तकाच्या पानाकडे इशारा करत म्हटले, “हेच तर यात लिहले आहे. आता मला प्रेयरीचा अजून काही भाग दाखव.” ती म्हणाली.



पूर्ण दिवस नोआहने मावशीला इकडेतिकडे फिरवले. पूर्ण दिवस डोरा मावशीने जे काही बघितले त्याच्या बाबत अनेक प्रश्न विचारले. नोआहने तिला सगळं काही सांगितलं जे त्याला माहीत होतं. मग प्रत्येक वेळी आपल्या पुस्तकात डोरा मावशीने बघितलं आणि नोआहला त्याच्या बाबत वाचून सांगितलं.

नोआहला आश्चर्य वाटले. “डोरा मावशी तुला एवढं कसं माहीत आहे?”

“मी चण्यात खूप हुशार आहे,” मावशी म्हणाली.





अध्याय ५

तारे

त्या रात्री डोरा मावशीने नोआहला तिला बाहेर्र घेऊन जायला सांगितलं. रात्री आकाश चांदण्यांनी भरलेले होते.

"नोआह," डोरा मावशी म्हणाली, “तुला तिथे काय दिसत आहे?”

"तारे," नोआह म्हणाला.

“मलाही तारेच दिसत आहेत्प्न त्यात मला चित्र दिसत आहे.”

"चित्र? कुठे?"

“बघ तिथे आकाशात देखो पराक्रमी योद्‍धा हरक्यूलिस आहे. बघ, तो एक साप आह. तिथे सप्तर्षी आहेत. त्याच्या जवळ लघु सप्तर्षी आहे.”

नोआह म्हणाला. “तू जे काही मला सांगत आहे ते सगळं या पुस्तकातून शिकली आहेस का?”

“पुस्तके वाचल्यानेच ते सगळं मला समजून घेता येते.जे काही मी बघते आणि ऐकते.”


नोआहने मान खाली घातली, “पण या मैदानी भागात प्रेयरीमध्ये पुस्तके उपलब्ध नाहीत.”

“माझी पेटी पुस्तकांनी भरलेली आहे.”

नोआह काहीच म्हणाला नाही.

"नोआह," डोरा मावशी हळू आवाजात म्हणाली, “वाचायला शिक आणि मग एक दिवस तू प्रेयरी सुद्धा वाचू शकशील. तुला याबाबत काय म्हणायचे आहे?”

एका क्षणानंतर नोआह म्हणाला, “मी ते करण्याचा जरूर प्रयत्न करू शकतो.”




अध्याय ६


शिकणे

दुसऱ्या दिव्वशी सकाळी, उन्हामध्ये नोआह, डोरा मावशीच्या पायाजवळ बसला.

डोरा मावशीने एक पुस्तक त्याच्याकडे सोपवले, “हे एक प्राथमिक पुस्तक आहे,” ती म्हणाली, “तुझे पहिले पुस्तक.”

नोआहने पुस्तक उघडले.







नोआह घाबरून उभा राहिला. हळूहळू त्याने २६ अक्षरे तोंडी म्हणून दाखवली.


“मी आता सगळं शिकलो का?” त्याने डोरा मावशीला विचारले.

“हो बिलकुल."

यामुळे मिस्टर बिडसन एवढे उत्साहित झाले की त्यांनी आपली मुठ जोरात टेबलवर आपटली. मिसेज़ बिडसन यांनी आनंदाने टाळी वाजवली.

त्या आठवड्यात मावशीने नोआहला एका पाटीवर अक्षरे शिकवली आणि लिहण्याचे काम दिले. कितीतरी वेळ नोआहने मेहनत केली की त्याचा हात आणि डोके दुखू लागले. आठवड्याच्या शेवटी डोरा मावशीने घोषणा केली की “आता नोआह सगळी अक्षरे वाचू शकतो.”





अध्याय ७

सौभाग्य

आता नोआहचे जीवन बदलले होते. तो अजूनही घरातली काही कामे करत असे. पण बाकी कामे आईबाब करत असत कारण त्यांचा नोआह शिकण्यात अधिक वेळ व्यतीत करत असे.

काही दिवस नोआहने ती पुस्तके वाचली जी डोरा मावशीने आपल्या बरोबर आणली होती. इतर दिवशी मावशीने नोआहला प्रेयरीमध्ये बाहेर घेऊन जायला सांगितले. तिथे मावशी नोआहला कविता,कहाण्या वाचवून दाखवत असे. कधी कधी ती त्याला तिथल्या जमिनीच्या बाबत काही वाचून दाखवत असे. अधिकतर वेळ मावशी, नोआहला वाचायला सांगत असे.

दोन महिन्यानंतर ते एका डोंगरावर जात होते तेव्हा मावशी जोरात ओरडली,"थांब!"

“काय झालं?" नोआहने विचारले.



डोरा मावशीने दाखवले, "एक फुल आहे जे आपण याआधी कधी पाहिले नाही. ते कोणते आहे?" तिने नोआहला आपले फुलांचे पुस्तक दिले.

नोआहने फूलाकडे बघितले आणि मग पुस्तक उघडले. “याला प्रेयरी बेल' म्हणतात, त्याने हळूहळू वाचले. “हे फुल वर्षातून फक्त एकदाच येते. जे लोक हे फुल बघतात ते खूप भाग्यवान असतात."

डोरा मावशी हसली, “आता, नोआह, जर तू हे कधी वाचले नसते तर तुला हे कधीच समजले नसते की तू आपल्या पूर्ण जीवनभर भाग्यशाली राहशील."




चार महिन्यानंतर डोरा मावशीने नोआहला जीवनाबद्दलची "द साल्म ऑफ़ लाइफ" नावाची कविता जोरात वाचायला सांगितली.

जेव्हा नोआहने वाचन संपवले,तेव्हा मिस्टर बिडसन म्हणाले, “ही सगळ्यात ने कहा, शक्तिशाली कविता आहे जी कधीकाळी ऐकली होती.” त्यांच्या डोळ्यात अश्रू आले.है

मिसेज़ बिडसन यांनी नोआहला जवळ घेतले. मग त्यांनी आपल्या बहिणीला जवळ घेतले.

त्या रात्री नोआह अंथरूणावर पडला, तेव्हा तो खूप उत्साहित होता आणि त्याला झोप येत नव्हती. त्याने आपल्या आईला बोलतांना ऐकले, “आपला नोआह आपल्यापेक्षा खूप हुशार होणार आहे.”


“मला खूप अभिमान वाटत आहे,” त्याचे वडील म्हणाले.




तेव्हा पासून नोआह नेहमी रात्री जेवण झाल्यावर परिवाराला काही वाचून दाखवत असे. कधी-कधी ती कविता असे, किंवा एखाद्या इतिहासाच्या पुस्तकातील एक अध्याय. कधी-कधी तो बायबलचा छोटासा भाग वाचून दाखवत असे.

सुरुवातीला तो हळूहळू वाचत असे. बऱ्याचदा त्याला शब्द वाचण्यासाठी डोरा मावशीच्या मदतीची गरज भासे. पण दिवसेंदिवस तो उत्तम होत होता.

कधी-कधी नोआह आपल्या वाचण्याने एवढा खुश होत असे की तो बाहेर फिरत असे आणि तारयाचे निरीक्षण करत असे.तेव्हा त्याला वाटे की सगळ्या ताऱ्यांमध्ये चित्रं लपली आहेत.





अध्याय ८

शेवटचा धडा

एका रात्री डोरा आणि नोआह बाहेर तारे निरखत होते.

"डोरा मावशी," नोआह म्हणाला, “मला एक नवीन नक्षत्र सापडले आहे.”

“कोणते?”

“त्याला ‘व्हीलचेयर’ म्हणतात आणि त्यात तू बसली आहे. बघ, हे ते तारे- त्याने तिचे नाव सांगितले.

"नोआह बिडसन!" डोरा मावशी हसली. “आता जेव्हा तू मला स्वर्गात बघतोच आहे, तर मला वाटते की आता मला माझ्या घरी जायची वेळ आली आहे.”

"डोरा मावशी मला वाटते की तू इथेच रहा आणि मला अजून शिकव.

“पण हिवाळा सुरु होण्याच्या आधी मला माझ्या घरी जाणे गरजेचे आहे,” ती म्हणाली. “तू एक चांगली सुरुवात केली आहे, नोआह. आता तू स्वतःच स्वतःचा चांगला शिक्षक हो.”


नोआह विचार करू लागला. “मावशी तुला एक प्रश्न विचारू का?”

"बेशक."

"व्हीलचेयरमध्ये नेहमी बसने कठीण असते का?”

“हो."

“जर तू आपली सर्व पुस्तके आणि वाचन सोडून देऊन पायांनी काम करू शकली, तर तू तसे करशील का?”



डोरा मावशी गप्प बसली. मग ती म्हणाली, "नोआह, पुस्तकांनी माझा मेंदू जितका पुढे जाऊ शकतो तितके माझे पाय माझ्या शरीराल नेऊ शकत नाही, दोन्ही असतील तर तुम्ही दुप्पट दूर जाऊ शकाल असा याचा अर्थ होतो.




दोन आठवड्यानंतर, नोआह, त्याची आई आणि डोरा मावशी परत रेल्वे स्टेशनवर गेले..

मिसेज़ बिडसन यांनी आपल्या बहिणीला अश्रुपूर्ण नजरेने मिठी मारली.

जेव्हा नोआहने डोरा मावशीला मिठी मारली तेव्हा तिने नोआहला एक पत्र दिले. “जेव्हा तू घरी जाशील, तेव्हा हे वाच.” ती म्हणाली.

नोआह त्या रात्री उशिरा घरी पोहचला. त्याने डोरा मावशीचे पत्र बाहेर नेले आणि त्याने ते एकट्याने वाचले.



प्रिय नोआह,

आता मी पूर्वेकडे जाणाऱ्या ट्रेन मध्ये आहे, तू प्रेयरीच्या ताऱ्याखाली असशील. पण तू लिहू-वाचू शकतो,म्हणून तू कितीही दूर असला तरी आपण नेहमी एकमेकांशी गप्पा मारू शकू.

तुझी प्रेमळ मावशी

डोरा

त्याच रात्री नोआह बसला आणि त्याने आपले पहिले पत्र लिहले.



प्रिय डोरा मावशी ,

मी प्रेयरी मध्ये राहतो.पण आता
मी पूर्ण जग वाचू शकतो.

तुझा प्रेमळ भाच्चा

नोआह